# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२५

---

### अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

### प्रश्नांची एकूण संख्या - २०

---

### अकोला शिवणी विमानतळाच्या विस्तारीकरणाबाबत

**(१) २३ (२१-०४-२०२५) श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे : दिनांक ८ जुलै, २०२४ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १ मधील प्रश्न क्रमांक २१५६८ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला शिवणी विमानतळ विस्तारीकरण ११०० मीटरने वाढविण्यात येणार असल्याने त्यासाठी डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाची ३५३ एकर व खाजगी २७ एकर जमीन संपादित करणे आवश्यक असताना मागील तीन वर्षापासून जमीन संपादनास विलंब होत असल्याने विमानतळाच्या विस्तारीकरणाचे काम प्रलंबित असल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या ३५३ एकर जमिनीबाबत तात्काळ प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविण्यात आले असताना विद्यापीठाकडून प्रस्ताव सादर करण्यासाठी विलंब होत असल्याने विमानतळाच्या विस्तारीकरणाच्या कामाला विलंब होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाची ३५३ एकर व खाजगी २७ एकर जमीन संपादनाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१२-०६-२०२५) :** (१), (२) व (३)अंशत: खरे आहे,

अकोला विमानतळाच्या धावपट्टीचा विस्तार हा १४०० मीटर वरुन १८०० मीटर पर्यंत करावयाचा आहे.

या विस्तारीकरणांतर्गत डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या मालकीच्या ३५३ एकर जमिनीचा समावेश नसून यामध्ये खाजगी २२.२४ हे.आर जमीनीचा समावेश आहे. त्यामुळे विद्यापीठाची जमीन संपादनाचा प्रश्न उद्‌भवत नाही. २२.२४ हे.आर. खाजगी जमीन संपादनासंदर्भात नवीन रेडीरेकनरचे

दर विचारात घेवून प्रशासकीय व वित्तीय मान्यतेबाबतची कार्यवाही महाराष्ट्र वितानतळ विकास कंपनीमार्फत सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात खाजगी पशुवैद्यकीय महाविद्यालये स्थापन करण्याचा शासनाने घेतलेल्या निर्णयाबाबत

**(२) २८ (२२-०४-२०२५) श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शासकीय पशुवैद्यकीय महाविद्यालये असतानाही नव्या खाजगी महाविद्यालयांची स्थापन करण्याचा शासनाने निर्णय घेतला असून अकोला, जळगाव आणि अहिल्यानगर येथे शासकीय पशुवैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याची घोषणा केल्यानंतरही अद्याप कोणतीही कार्यवाही केली गेली नसल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अकोला जिल्ह्यात सन २०१६-१७ मध्ये तत्कालीन शासनाच्या काळात पशुवैद्यकीय पदवी महाविद्यालयाची घोषणा केली असून याकरीता डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाने बाभूळगांव येथील जागा देण्याचा प्रस्ताव पशुवैद्यक व पशुविज्ञान संस्थेला दिला व २७ हेक्टर जागाही उपलब्ध करुन दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महाविद्यालयाकरीता ३५० कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असूनही गत आठ वर्षांपासून महाविद्यालय सुरु न झाल्याने अनेक विद्यार्थ्यांना शिक्षणाकरीता नागपूर येथे जावे लागत असल्याने उक्त महाविद्यालय सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(४) असल्यास, राज्यात पशुवैद्यकीय महाविद्यालयांची अवस्था अत्यंत बिकट असून पायाभूत सुविधांचा अभाव निर्माण झालेला असताना राज्यात मुबलक प्रमाणात पशुवैद्य उपलब्ध असूनही, खाजगी पशुवैद्यकीय महाविद्यालयांची स्थापन करण्याच्या शासनाच्या निर्णयामुळे बेरोजगारीच्या प्रमाणात वाढ होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, तद्नुषंगाने नव्या पशुवैद्यकीय महाविद्यालयांना परवाने देण्याऐवजी विद्यमान महाविद्यालयांना निधी आणि संसाधने पुरवून त्यांचा दर्जा सुधारण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०६-२०२५) :** (१) शासनाने अकोला व अहिल्यानगर येथे शासकीय पशुवैद्यक महाविद्यालय स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे.
(२) व (३) सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून पदवी पशुवैद्यकीय महाविद्यालय, अकोला येथे ८० विद्यार्थींना पशुवैद्यकीय पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश देवून महाविद्यालय सुरु करण्यात आले आहे.
(४) व (५) राज्यात कार्यरत असलेल्या शासकीय पशुवैद्यक महाविद्यालयांमधून दरवर्षी सर्वसाधारणपणे ४०० विद्यार्थी पदवी घेवून बाहेर पडतात.

भारतीय पशुवैद्यक परिषद अधिनियमातील कलम ३० पशुवैद्यकीय उपचार करण्यासाठी नोंदणीकृत पशुवैद्यकीय पदवीधर पात्र ठरतो. शासनाने दिनांक १०/१०/२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये पशुसंवर्धन

व दुग्ध व्यवसाय विभागाची पुर्नरचना केली असून, त्यामध्ये श्रेणी-२ च्या पशुवैद्यकीय संस्थांचे श्रेणी-१ मध्ये श्रेणीवाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे सर्व म्हणजे ४६८५ पशुवैद्यकीय संस्थांचे प्रमुख म्हणून पदवीधारक पशुवैद्यकांची नियुक्ती करणे आवश्यक आहे. तसेच राज्याच्या अर्थव्यवस्थेत भर घालण्यासाठी पशुसंवर्धन क्षेत्रास मोठा वाव आहे. त्यामुळे पुनर्रचनेदरम्यान पशुसवंर्धन क्षेत्रात उद्योजकता विकास घडवून आणण्यासाठी शासकीय क्षेत्राबरोबरच खाजगी क्षेत्रात पशुवैद्यकांची मोठ्या प्रमाणात आवश्यकता आहे, ही बाब विचारात घेवून शासकीय पशुवैद्यकीय महाविद्यालयांबरोबरच प्रत्येक महसूली विभागात १ अशासकीय विनाअनुदानित पशुवैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याचा तत्वत: निर्णय घेतला आहे.

(६) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

## सीमावर्ती मराठी भाषिक गावे विलीन करण्यासह गावांच्या सुविधा वाढविण्याबाबत

**(३) २७६ (२२-०४-२०२५) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रातील सीमारेषेवरील गावांना मिळणाऱ्या सोयीसुविधांमध्ये वाढ करणे, तेथील पाण्याचा प्रश्न सोडविणे या व्यतिरिक्त कर्नाटकातील ८५० सीमावर्ती मराठी भाषिक गावे विलीन करण्यात यावीत यासंदर्भात सन २०२२-२३ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री यांनी राज्याच्या विधीमंडळात अनेक ठराव मंजूर केले असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त मंजूर केलेल्या ठरावातील बाबीसंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२७-०६-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र कर्नाटक सीमा प्रश्नासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित दाव्यासंदर्भात कायदेशीर पाठपुरावा करण्याबाबत आणि केंद्र शासनाने सीमा भागातील मराठी जनतेच्या सुरक्षतेची हमी घेण्याची कर्नाटक सरकारला समज देण्याबाबतचा शासकीय ठराव दिनांक २७/१२/२०२२ रोजी विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांमध्ये संमत करण्यात आला आहे.

(२)विधीमंडळाने पारीत केलेल्या ठरावाच्या अनुषंगाने उचित कार्यवाही करण्यास्तव दिनांक १६/०३/२०२३ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनास कळविलेले आहे. त्याचप्रमाणे मा.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित दाव्यामध्ये महाराष्ट्र शासनाची खंबीरपणे बाजू मांडण्यासाठी तज्ञ वकीलांची नियुक्ती करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## समाजमाध्यमांवरील महिलांच्या चारित्र्याच्या हल्ल्यांविरोधात नवा सुधारित कायदा करण्याबाबत

**(४) ६०० (२२-०४-२०२५) श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महिला, मुलींना विशेषतः सामाजिक व प्रसिध्दीच्या झोतात असलेल्या महिलांना समाजमाध्यमांवर विकृत मानसिकतेच्या व्यक्तींकडून ट्रोल केले जाते, यासंबंधी सायबर गुन्हा कायदा असूनदेखील कायद्याची अंमलबजावणी होत नसल्याचे माहे, मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र व देशातल्या प्रतिष्ठित महिला व समाज माध्यम वापरणाऱ्या सर्व महिलांना या अश्लिल व अर्वाच्य भाषेच्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भातील सायबर गुन्हा हा कायदा कठोर करुन त्याची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२५-०६-२०२५) :** (१),(२) व (३) सन २०२५ मध्ये बीड, भंडारा, कोल्हापूर, मुंबई शहर, नागपूर ग्रामीण, पिंपरी चिंचवड, पुणे शहर व सिंधुदुर्ग या ठिकाणी महिलांना समाज माध्यमांवर ट्रोल केले जात असल्यासंदर्भात १४१ गुन्हे दाखल असून ६१ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

**राज्यात महिला अत्याचारास प्रतिबंध करण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना केल्या जातात**

• महिला अत्याचाराबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार प्राप्त झाल्यास त्या बाबत तांत्रिक तपास करण्यासाठी महाराष्ट्र सायबर कार्यालयात CCPWC (Cyber Crime Prevention against Women and Child) लॅबची स्थापना करण्यात आलेली आहे. सदर लॅब मध्ये महाराष्ट्रातील सर्व अधिकारी व अंमलदारांना प्रशिक्षण देण्यात येते.

• सन २०१९ पासून महाराष्ट्र सायबर यांनी महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांतील पोलीसांच्या सहभागाने "सायबर सेफ वुमन" ही मोहिम सुरू केली आहे. त्यामध्ये इंटरनेट वरील फिशींग, वैवाहीक विषयक साईट वरील ओळख चोरी, फोटो मधील फेरबदल, बँका संदर्भातील फसवणूक, पोर्नोग्राफी, सायबर बुलिंग याची माहिती देणारी संकेतस्थळे यांची माहिती या पासून प्रतिबंधात्मक उपाय, सायबर गुन्ह्या संदर्भातील कायदे तसेच सोशल मिडिया वापरतांना घ्यावयाची काळजी याबाबत प्रत्येक जिल्ह्यात कार्यशाळा राबवण्यात येतात.

• महाराष्ट्र सायबर कार्यालयात CCPWC पोर्टल कार्यरत असून त्यावर राज्यभरातील महिला ऑनलाईन तक्रार दाखल करु शकतात. सदर तक्रार दाखल केल्यानंतर महाराष्ट्र सायबर कडून तात्काळ संबंधित जिल्ह्यांना तक्रार पाठविण्यात येते व त्याबाबत वेळोवेळी पाठपुरावा करण्यात येतो.

• राज्य शासनाने सायबर फसवणूकीला बळी पडणाऱ्या नागरिकांना विशेषत: महिला, बालके व ज्येष्ठ नागरिकांना केंद्र स्थानी ठेवून अत्याधूनिक तंत्रज्ञान, कुशल मनुष्यबळ आणि संसाधनांनी युक्त अशा उपाय योजनांचा समावेश असलेल्या महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्प राबविण्यासाठी दिनांक २७/०९/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता दिली आहे. त्यानुसार सदर सायबर सुरक्षा प्रकल्पाचे उद्घाटन महापे, नवी मुंबई येथील इमारती मध्ये करण्यात आले आहे. सदर प्रकल्प राज्यातील सायबर सुरक्षा

आणि सायबर गुन्हे नियंत्रणासाठी हा एक अत्याधुनिक केंद्रबिंदू ठरेल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## ओबीसी विद्यार्थ्यांना प्रलंबित प्री-मॅट्रीक शिष्यवृत्ती मिळण्याबाबत

**(५) ६०७ (२३-०४-२०२५) श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा जिल्ह्यातील सन २०२३-२४ मध्ये इतर मागासवर्ग विद्यार्थ्यांसाठी प्री-मॅट्रीक शिष्यवृत्तीसाठी शासनाकडून ५,८२,७४,००० रुपये निधी प्राप्त झाला असून सदर निधीपैकी फक्त २६,६७,००० रुपये वितरीत करण्यात आले आणि ५,५६,०७,००० रुपये परत गेले असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निधी परत जाण्याची कारणे काय आहेत तसेच ओबीसी विद्यार्थ्यांची प्रलंबित प्री-मॅट्रीक शिष्यवृत्ती मिळण्याबाबत व निधी वितरण करण्यास दिरंगाई करणाऱ्या संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (२०-०६-२०२५) :** (१) हे खरे आहे,
(२) सन २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये भंडारा जिल्ह्यासाठी इतर मागास वर्गीय मुलांना केंद्रीय शिष्यवृत्ती योजनेकरीता रुपये ५,८२,७४,००० रुपये इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला होता. तथापि, पी.एफ.एम.एस. प्रणालीवर काही तांत्रिक अडचणी उद्भवल्यामुळे सदर निधीपैकी फक्त रुपये २६,६७,०००/- इतका निधी खर्च करण्यात आला होता. तथापि, त्यानंतर पुढील आर्थिक वर्षात सन २०२४-२५ मध्ये पी.एफ.एम.एस. प्रणालीवरील एस.एन.ए. खात्यावर शिल्लक असलेला निधी भंडारा जिल्ह्यासाठी पुन:श्च उपलब्ध करुन दिला असून सदर निधी संपूर्णत: खर्च करण्यात आला आहे. एकूण ३२०७६ इतक्या लाभार्थींना शिष्यवृत्तीचा लाभ देण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात खाद्यतेलाच्या वाढत्या किंमतीवर नियंत्रण आणण्याबाबत

**(६) ७०३ (२४-०४-२०२५) श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मागील चार महिन्यांपासून खाद्यतेलाच्या किंमतीमध्ये २५ टक्के वाढ झाली असल्याने खाद्यतेलाच्या वाढत्या किंमतीमुळे सर्वसामान्य नागरिकांचे आर्थिक नियोजन कोलमडत असल्याचे माहे जानेवारी,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने खाद्यतेलाच्या वाढत्या किंमतीवर नियंत्रण आणण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ (२६-०६-२०२५) :** (१) हे खरे नाही.
राज्यात मागील चार महिन्यांपासून खाद्यतेलाच्या किंमतीमध्ये २५ टक्के इतकी वाढ झालेली नाही. तथापि, जानेवारी, २०२५ ते एप्रिल, २०२५ या चार महिन्याच्या कालावधीत शेंगदाणा तेल व राईचे तेल या तेलांच्या किंमतीमध्ये ०.१८% ते १.४३% घट झाली आहे. तसेच पामतेल, सोया तेल, सनफ्लॉवर तेल व वनस्पती (डालडा) यांच्या किंमतीमध्ये १.५५% ते ३.०४% एवढी वाढ झाली आहे.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात प्रगणकांची संख्या कमी असल्यामुळे पशुगणनेस मुदतवाढ देण्याबाबत

**(७) ११७३ (२३-०४-२०२५) श्री.अरुण लाड, श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात पशुगणनेसाठी गावांच्या आणि प्रभागाच्या संख्येच्या तुलनेत प्रगणकांची संख्या पुरेशी नसल्याने सांगली जिल्ह्यात केवळ ४० टक्के ऑनलाईन पशुगणना पूर्ण झाली आहे, पशुगणना करण्यासाठी सध्याच्या प्रगणकांवर ताण येत असल्यामुळे पशुगणना करण्यास विलंब होत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र वगळता इतर राज्यात २५ नोव्हेंबर, २०२४ पासून पशुगणना सुरु झाली असून मार्च अखेर गणना पूर्ण करण्याची मुदत होती परंतु राज्यात आचारसंहिता असल्याने आता माहे फेब्रुवारी, २०२५ अखेर पशुगणना पूर्ण होण्याची शक्यता नसल्याने केंद्राकडून पशुगणनेस मुदतवाढ मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२७-०६-२०२५) :** (१) हे खरे नाही.
केंद्र शासनामार्फत विहीत केलेल्या निकषानुसार सांगली जिल्ह्यात प्रगणक व पर्यवेक्षक यांची नेमणूक केली होती. नियुक्त करण्यात आलेल्या प्रगणक व पर्यवेक्षक यांनी केंद्र शासनाने विहित केलेल्या कालमर्यादेच्या आत म्हणजे दिनांक १४/०४/ २०२५ रोजी पशुगणना १००% पूर्ण करण्यात आलेली आहे.
(२) केंद्र शासनामार्फत सर्व राज्यांकरीता २१ वी पशुगणना पूर्ण करण्यास दिनांक ३०/०४/२०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. त्यानुसार महाराष्ट्र राज्यात दिनांक ३०/०४/२०२५ रोजी १००% पशुगणना पूर्ण करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उदभवत नाही.

---

## मुक्ताईनगर, बोदवड (जि.जळगाव) तालुक्यातील मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतंर्गत रस्त्यांची कामे निकृष्ट दर्जाची झाली असल्याबाबत

**(८) १५४० (२४-०४-२०२५) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१९ पासून मुक्ताईनगर, बोदवड (जि.जळगाव) तालुक्यातील मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत झालेल्या रस्त्यांची कामे निकृष्ट दर्जाची असून सदर कामांची देखभाल दुरुस्ती न झाल्याने वाहतुकीस अयोग्य असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू रस्ते दुरस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.जयकुमार गोरे (२६-०६-२०२५) :** (१), (२) हे खरे नाही. मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत सन २०१९ पासून मुक्ताईनगर तालुक्यातील कामे ही योजनेच्या प्रचलित मार्गदर्शक सुचनांनुसार पूर्ण करण्यात आली आहेत. सदरहू कामाच्या वेळोवेळी पाहणी दरम्यान त्यांस समाधानकारक शेरा प्राप्त आहे. तसेच दोष दायित्व कालावधीतील कामांबाबात संबंधित ठेकेदारांकडून आवश्यकतेनुसार दुरूस्ती करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील ग्रामीण भगातील युवक-युवतींना कौशल्य रोजगार उपलब्ध करून देण्याबाबत

**(९) १७३२ (२४-०४-२०२५) श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील दुष्काळग्रस्त ग्रामीण भागातील अल्पभूधारक शेतकरी नैसर्गिक आपत्ती किंवा नापिकीमुळे त्रस्त असून परिणामी शेतीमध्ये पारंगत असूनही शेतीपूरक रोजगार व्यवसाय उपलब्ध नसल्याने हजारोच्या संख्येत शहराकडे येऊन मिळेल तो रोजगार स्वीकारुन त्यांना आपली उपजिविका करावी लागत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, १५ ते ३५ वयोगटातील ग्रामीण युवक-युवतींना कौशल्य प्रशिक्षण देऊन गुणवत्तेच्या आधारावर नोकरी मिळण्याचे प्रमाण अत्यल्प असल्याचे दिसून येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कौशल्य प्रशिक्षण योजनेची व्याप्ती वाढवून ग्रामीण भागातील प्रत्येक गावात सदर योजनेबाबत जनजागृती करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा (३०-०६-२०२५) :** (१) हे खरे नाही.
कृषी विभागाच्या निदर्शनास अशी बाब आलेली नाही.
(२) अंशत: खरे आहे.
या विभागामार्फत वयोगट १५ ते ४५ मधील युवक-युवतींना कौशल्य प्रशिक्षण देण्यात येते. प्रशिक्षित प्रशिक्षणार्थींना औद्योगिक संस्थांच्या मागणीनुसार रोजगार व स्वंयरोजगाराच्या संधी उपलब्ध होतात.
(३) प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता अभियानांतर्गत राज्यात ५११ प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्र सुरु करण्यास मान्यता दिली असून या केंद्रामार्फत ग्रामीण भागातील युवक युवतींना रोजगार व

स्वयंरोजगारक्षम बनविण्यासाठी कौशल्य विकास प्रशिक्षण प्रदान करण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## केंद्र आणि राज्याने सुरू केलेल्या सामाजिक सुविधा करीता विशेष वॉर रूम स्थापन केल्याबाबत

**(१०) २१८४ (२४-०४-२०२५) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र आणि राज्याने सुरू केलेल्या सामाजिक सुविधा जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी मा.मुख्यमंत्री महोदयांनी विशेष वॉर रूम स्थापन केली असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वॉररूम केव्हांपासून सुरु होणार आहे व राज्यातील नागरिकांना या वॉररूमच्या सहाय्याने कशा प्रकारे मदत मिळणार आहे, त्याबाबतचा सविस्तर तपशील काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०२-०७-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) वॉर रुमच्या प्रथम बैठकीपासून म्हणजेच दिनांक ०३/०२/२०२५ पासून सामाजिक क्षेत्रे वॉर रुम कार्यरत झाली आहे. केंद्र व राज्य शासनाने सुरु केलेल्या महत्वपूर्ण योजनांचा वॉर रुम (सामाजिक) च्या माध्यमातून मा.मुख्यमंत्री यांचेकडून सर्व संबंधित यंत्रणांचा आढावा घेण्यात येत असल्याने, योजना अंमलबजावणीमधील अडीअडचणी सोडविण्यासाठी तसेच आंतरविभागीय समन्वयन साधून योजनांचा शीघ्र गतीने लाभ राज्यातील जनतेपर्यंत पाहोचविण्यासाठी मदत होत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रातील शासकीय कार्यालये शासकीय जागेत कार्यरत ठेवण्याबाबत

**(११) १६६०४ (२९-१२-२०२२) श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रात किती शासकीय कार्यालये खाजगी जागेमध्ये भाडेतत्वावर कार्यरत आहेत, सदरहू कार्यालयाच्या भाड्यापोटी एकूण किती शासकीय निधी (मासिक/वार्षिक) खर्च करण्यात येत आहे,
(२) असल्यास, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रात एकूण किती शासकीय जागा उपलब्ध आहेत,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाचा महसूल वाचविण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रातील सर्व शासकीय कार्यालये शासकीय जागेतील शासकीय इमारतीमध्ये कार्यरत राहण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (२८-०५-२०२५) :** (१) सार्वजनिक बांधकाम मंडळ, मुंबई मंडळाच्या अधिपत्याखाली विभागीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात एकूण ७४ शासकीय कार्यालये खाजगी जागेमध्ये भाडेतत्वावर कार्यरत असून सदरहू कार्यालयाच्या भाड्यापोटी मासिक रुपये ७३२.१० लक्ष व वार्षिक रुपये ८७२५.२६ लक्ष रक्कम सा.बां.विभागामार्फत प्रमाणित करण्यात आलेली आहे. तसेच ठाणे जिल्ह्यात एकूण ३१ कार्यालये खाजगी जागेमध्ये भाडेतत्वावर असून पालघर जिल्ह्यामध्ये एकूण १४ कार्यालये खाजगी जागेमध्ये भाडेतत्वावर कार्यरत आहेत. ठाणे जिल्ह्याकरीता रुपये ६०.६६ लक्ष व पालघर जिल्ह्याकरीता रुपये ५.९९ लक्ष रक्कम खर्च होत आहे.

तथापि, प्रत्यक्ष मासिक /वार्षिक भाड्यापोटी खर्च होणारा निधी संबंधित उपभोक्ता शासकीय विभागाकडून करण्यात येतो.

(२) सार्वजनिक बांधकाम मंडळ, मुंबई यांच्या अधिपत्याखालील विभागीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात एकूण २६९४ चौ.मी.मोकळया जागा आहेत. परंतु सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोकण यांच्या अधिपत्याखाली शासकीय जागा उपलब्ध नाही.

(३) या विभागाशी संबंधित नसल्यामुळे प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात अतिविशेषोपचार विभागाची व्याप्ती वाढविण्याबाबत

**(१२) १९७५० (०८-०८-२०२३) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोना संसर्गानंतर आरोग्यासंदर्भात विविध आजारांची समस्या निर्माण झाल्या असून बदलते आजार व त्यांच्या तीव्रतेचा विचार करुन त्यावर उपचार करण्यासाठी अतिविशेषोपचार विभागाची व्याप्ती वाढविण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरोग्य क्षेत्रातील तज्ञाच्या मतानुसार अशा आजारांवरील उपचारांसाठी प्रमुख वैद्यकीय संस्थामध्ये ५०० पेक्षा अधिक तज्ञांची गरज आहे तसेच रुग्णालयांतील पदनियुक्तीचे नियोजन आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने यासंदर्भात माहिती घेऊन सदरील बाबींबाबत कोणती कार्यवाही केली आहे, वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.हसन मुश्रीफ (१८-०६-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) विभागाच्या अधिपत्याखालील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयामध्ये गंभीर आजारावरील तज्ञांची पदे मंजूर आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

## राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत माती परिक्षणाकरीता सुक्ष्म पोषक घटक योजना सुरू करण्याबाबत

**(१३) २१७०७ (३१-१२-२०२३) श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मृदेचे सुधारित आणि शाश्वत आरोग्य राखण्यासोबतच सुपिकतेची स्थिती लक्षात घेवून प्रति युनिट जास्त उत्पादन सुनिश्चित करण्यासाठी पोषक तत्वांची योग्य मात्रा लागू करता यावी म्हणून शेतकऱ्यांना मृदा आरोग्य कार्ड प्रदान करण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केंद्र शासनाच्या कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाने माती आरोग्य पत्रिकेचा डेटा वापरून डिजिटल मृदा आरोग्य नकाशे तयार केले असून सुक्ष्म पोषक घटकांची गंभीर कमतरता असलेले भौगोलिक भाग ओळखून त्यावर उपाययोजना करून शेतकऱ्यांना सहाय्य करण्याकरीता या नकाशांचा वापर करण्यात येतो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कर्नाटक शासनाने सुरू केलेल्या भूचेतना प्रकल्पाच्या धर्तीवर राज्यातील पावसावर आधारित कोरडवाहू शेतीची कृषी उत्पादकता सुधारून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत ५० टक्के अनुदान तत्वावर माती परिक्षणावर आधारित सुक्ष्म पोषक घटक योजना सुरू करून सदरहू योजना गाव / क्लस्टर पातळीवरील शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्याची विनंती लोकप्रतिनिधी यांनी मा.कृषी मंत्री यांना माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे केली होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, त्यानुषंगाने या प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे, असल्यास त्याचा तपशील काय आहे, नसल्यास त्याची कारणे काय आहेत,
(५) असल्यास, सदरहू योजना सुरू करण्याबाबत शासनाची नेमकी भूमिका काय असून या प्रकरणी शासन सकारात्मक असल्यास याबाबतची कार्यवाही शासन किती कालावधीत करणार आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे (०३-०३-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे,
(३) होय, खरे आहे.
(४) राज्यात राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत मृद आरोग्य अबाधित राखण्यासाठी तसेच एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापनाला चालना देण्याकरीता मृद तपासणीवर आधारित खतांच्या संतुलित तसेच कार्यक्षम वापराच्या अनुषंगाने सन २०१५-१६ पासून जमीन आरोग्य व सुपीकता व्यवस्थापन कार्यक्रम राबविण्यात येत आहे. सन २०२२-२३ पासून ही योजना राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत मृद आरोग्य व सुपीकता कार्यक्रम या नावाने राबविण्यात येत आहे.
(५) सन २०२३-२४ च्या वार्षिक कृती आराखड्यानुसार राज्यात एकूण २,४०,००० माती नमूने तपासणीचे

लक्षांक प्रस्तावित करण्यात आलेले आहेत. याकरीता प्रमुख व सुक्ष्म अन्नद्रव्यांसाठी मृद चाचणी प्रयोगशाळेत विश्लेषण करण्यात येते व त्याधारे शेतकऱ्यांना मृद आरोग्य पत्रिकेचे वितरण करण्यात येते. जमीन आरोग्य पत्रिकेच्या विश्लेषण अहवालानुसार प्रात्यक्षिकाचे आयोजन, शेतकरी मेळावे व प्रशिक्षणे इ.बाबी या कार्यक्रमात राबविण्यात येतात.

सदर योजनेबाबत शासनाची सकारात्मक भूमिका असून शाश्वत शेती पध्दती आणि मातीच्या आरोग्याविषयी विद्यार्थ्यांना महत्व पटवून देण्यासाठी शालेय मृदा आरोग्य कार्यक्रम हा एक पथदर्शी प्रकल्प हाती घेण्यात आलेला आहे. या कार्यक्रमांतर्गत शालेय विद्यार्थ्यांकडून मातीचे नमुने गोळा करुन त्याचे परीक्षण करुन मृद आरोग्य आणि पिकांच्या शिफारशीबद्दल शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात येत असून मृद आरोग्याबाबत जागरुकता करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नंदुरबार जिल्ह्यात सुरु असलेल्या अवैध धंद्यांवर बंदी घालण्याबाबत

**(१४) २१८३३ (२२-०४-२०२५) श्री.सचिन अहिर, ॲड.अनिल परब, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार जिल्ह्यात अनेक दिवसांपासून मोठ्या प्रमाणात सुरु असलेल्या अवैध धंद्यांवर बंदी घालण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनीधींनी मा.जिल्हाधिकारी, नंदुरबार यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यासुमारास केलेली असून तात्काळ कार्यवाही न झाल्यास रस्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा उक्त निवेदनात देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने अवैध धद्यांना बंदी घालण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२१-०४-२०२५) :** (१) होय. हे खरे आहे

(२) सदर निवेदनाच्या अनुषंगाने नंदुरबार जिल्ह्यात पोलीस घटकाकडून माहे सप्टेंबर- ऑक्टोंबर, २०२३ अखेर पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली.

| अ.क्र | अवैध बाब | एकूण गुन्हे | आरोपी | जप्त मुद्देमाल रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | दारुबंदी | ३६२ | ३६६ | ५९,४९,५७८/- |
| २ | जुगार | ७५ | १०६ | ४३,३८,४३९/- |
| ३ | अंमली पदार्थ | १ | ०२ | ९,७३,९८०/- |

नंदुरबार पोलीस घटकाकडून वेळोवेळी विशेष मोहिमा राबवून अवैध धंद्यांचे समुळ उच्चाटन करण्याबाबतची कारवाई सुरु आहे.

(३) विलंब झालेला नाही.

---

## जळगाव जिल्ह्यातील मुक्ताईनगर येथील शासकीय कृषी महाविद्यालय येथे पाणीपुरवठा योजनेस मंजुरी मिळणेबाबत

**(१५) २१८६१ (०३-०१-२०२४) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुक्ताईनगर (जि.जळगाव) येथील शासकीय कृषी महाविद्यालय येथे पाणीपुरवठा योजनेस मंजुरी मिळणे संदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.कृषी मंत्री यांना दिनांक २७ ऑगस्ट, २०२३ रोजी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासकीय कृषी महाविद्यालय येथे पाणीपुरवठा योजनेस मंजुरी देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे (०७-०२-२०२५) :** (१)हे खरे आहे.
(२) शासकीय कृषी महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे पाणीपुरवठा योजना मंजूर करण्याकरीताच्या सविस्तर प्रकल्प अहवालास व अंदाजपत्रकास मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रादेशिक विभाग, नाशिक यांनी तांत्रिक मान्यता प्रदान केली आहे. तसेच, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेच्या कृषी परिषदेने मान्यता प्रदान केली आहे. त्यानुषंगाने शासकीय कृषी महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे पाणीपुरवठा योजनेस प्रशासकीय मान्यता देण्याबाबतची कार्यवाही शासनस्तरावर विचाराधीन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या १६६ वसतिगृह अधिक्षकांना ४,२००/- ग्रेड पे देण्याबाबत

**(१६) २१९७१ (१०-०१-२०२४) श्री.शशिकांत शिंदे, श्री.अरुण लाड, श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या १६६ वसतिगृहातील अधिक्षकांना रुपये ४,२००/- ग्रेड पे साठी पात्र असताना अद्यापही त्यांना ४,२००/- ग्रेड पे देण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, १२ वर्षे पूर्ण झालेल्या वसतीगृह अधिक्षकांना ग्रेड पे देण्यात येईल, असे आश्वासन मा.इतर मागास बहुजन कल्याण मंत्री महोदयांनी दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या अधिक्षकांना रुपये ४,२००/- ग्रेड पे त्वरित देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.अतुल सावे (०५-०६-२०२५) :** (१) खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) विजाभज आश्रमशाळेतील वसतिगृह अधीक्षकांनी वेतन त्रुटी समितीसमोर बाजू मांडल्यानंतर वेतन

त्रुटी समितीच्या शिफारशीनुसार मा.मंत्रिमंडळाच्या मान्यतेने शासन निर्णय, वित्त विभाग, दिनांक ०२/०६/२०२५ अन्वये वसतिगृह अधिक्षकांना एस-८ (ग्रेड पे रुपये २८००/-) ऐवजी (एस-१२ ग्रेड पे रुपये ४२००/-) ही सुधारीत वेतनश्रेणी दिनांक ०१/०१/२०१६ पासून लागू करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील आशा, अंगणवाडी सेविकांचा कोरोना कालावधीतील प्रोत्साहन भत्ता प्रलंबित असल्याबाबत

**(१७) २३४७० (२०-०७-२०२४) श्री.सुधाकर अडबाले, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कोरोना कालावधीत काम केलेल्या आशा वर्कर व अंगणवाडी सेविकांना प्रती महिना हजार रूपये प्रोत्साहन भत्ता देण्याबाबत ग्रामविकास विभागाने निर्णय घेतला असून कोरोना संपुष्टात येऊन जवळपास अडीच वर्षांचा कालावधी उलटूनही प्रोत्साहन भत्ता मिळाला नसल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आशा वर्कर व अंगणवाडी सेविकांना केवळ एकाच महिन्याचा भत्ता देण्यात आला असून उर्वरित २३ महिन्यांचा प्रोत्साहन भत्ता अजूनही देण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आशा वर्कर तसेच अंगणवाडी सेविकांचा थकीत २३ महिन्यांचा प्रोत्साहन भत्ता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे (२६-०६-२०२५) :** (१) हे खरे नाही.

तथापि, तत्कालीन परिस्थितीत कोरोना या रोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ग्रामविकास विभागामार्फत उपाययोजना करण्यात आल्या. त्यानुषंगाने ग्रामपंचायत स्तरावर सर्व ग्रामपंचायत कर्मचारी, अंगणवाडी/ मिनी अंगणवाडी कार्यकर्त्या व अंगणवाडी मदतनिस, आशा कार्यकर्ती यांच्या मार्फत लोकांमध्ये जनजागृती, आरोग्याची काळजी घेणे इत्यादी कामे अहोरात्र मेहनत घेवून जिवाची पर्वा न करता करीत असल्याने महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ च्या अनुसूची १, ग्रामसूचीमध्ये कलम ४५ अन्वये विविध कामांचे विषय दिलेले आहेत. त्यामधील अ.क्र. २५ - कोणत्याही संक्रमक रोगाचा उद्रेक, फैलाव किंवा पुनरूभ्दवन होण्यास प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना करणे. या विषयाच्या अनुषंगाने सदर कर्मचारी हे आपल्या जिवाची जोखीम पत्करून ही कामे करीत असल्याने त्यांना मिळणाऱ्या नियमित वेतन / मानधन व्यतिरिक्त त्यांना रुपये १०००/- इतकी प्रोत्साहनपर रक्कम अदा करण्याबाबत दिनांक ३१/०३/२०२० रोजी परिपत्रक निर्गमित करण्यात आले.
(२) कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना रुपये १०००/- इतकी प्रोत्साहनपर रक्कम अदा करण्याबाबतच्या दिनांक ३१/०३/२०२० रोजी निर्गमित केलेल्या परिपत्रकात प्रोत्साहनपर रक्कम अदा करण्याबाबत निश्चित कालावधी नमूद करण्यात आला नव्हता.त्यानुषंगाने ग्रामपंचायत स्तरावरून उपलब्ध निधीमधून आशा, अंगणवाडी सेविकांना एक महिन्याकरीता रुपये १००० इतकी प्रोत्साहनपर रक्कम अदा करण्यात आली आहे.

(३) कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना रुपये १०००/- इतकी प्रोत्साहनपर रक्कम अदा करण्याबाबतच्या दिनांक ३१/०३/२०२० रोजी निर्गमित केलेल्या परिपत्रकात प्रोत्साहनपर रक्कम अदा करण्याबाबत निश्चित कालावधी नमूद करण्यात आला नव्हता त्यानुषंगाने ग्रामपंचायत स्तरावरून उपलब्ध निधीमधून आशा, अंगणवाडी सेविकांना एक महिन्याकरीता रुपये १००० इतकी प्रोत्साहनपर रक्कम अदा करण्यात आली. सद्य:स्थितीत थकीत २३ महिन्यांचा प्रोत्साहन भत्ता देण्याची बाब विचाराधीन नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही

---

## मेळघाट (जि.अमरावती) येथील धारणी, चिखलदरा, अचलपूर, अंजनगाव आदिवासी क्षेत्रामध्ये मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत

**(१८) २३९२४ (१८-०७-२०२४) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मेळघाट (जि.अमरावती) येथील धारणी, चिखलदरा, अचलपूर, अंजनगाव यां आदिवासी क्षेत्रात रस्ते, आरोग्याच्या सुविधा, शिक्षण, अंगणवाडी, घरकुल यासारख्या मानवाच्या मूलभूत गरजा शासन प्रशासनातर्फे पुरविण्यात आल्या नसून येथील वयोवृध्दांना संजय गांधी निराधार योजनेचा लाभही मिळत नसल्यामुळे मेळघाटातील आदिवासींच्या हक्कासाठी लढा देणाऱ्या अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेतर्फे दिनांक २० मार्च २०२४ रोजी वा त्या सुमारास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आदिवासींच्या मूलभूत गरजा पुरविण्यासंदर्भात शासनाने गंभीर दखल घेऊन कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.डॉ. अशोक उईके (२८-०२-२०२५) :** (१) अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद यांचे आदिवासी बहुल समाजाच्या मूलभूत समस्या सोडविण्याकरीता धरणे आंदोलनातील समस्या/प्रश्न निराकरणाबाबत चे निवेदन उपविभागीय अधिकारी, अचलपुर या कार्यालयाकडून जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांना दिनांक १८/०३/२०२४ रोजी प्राप्त झाले आहे.

मेळघाट जि.अमरावती परिसरातील क्षेत्रांमध्ये रस्ते, विकास, आरोग्यसेवा, शिक्षण, अंगणवाडी, घरकुल यासारख्या मूलभूत सुविधांसाठी विविध विभागांमार्फत, जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजना तसेच वार्षिक सर्वसाधारण योजना अंतर्गत विविध योजना राबविण्यात येत आहेत. मेळघाट, धारणी, चिखलदरा, अचलपुर, अंजनगाव सुर्जी येथील आदिवासी क्षेत्रामध्ये सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून संजय गांधी निराधार अनुदान योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना अर्थसहाय्य देण्यात येते.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वकील शेखर जगताप याने विशेष सरकारी अभियोक्ता असल्याची खोटी व बनावट कागदपत्रे सादर केल्याबाबत

**(१९) २३९८० (२२-०७-२०२४) श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विशेष सरकारी वकील नसतानाही काही महत्वाच्या खटल्यांमध्ये सरकारी पक्षाची बाजू मांडून मा.न्यायालय आणि शासनाची फसवणूक केल्याच्या आरोपाखाली वकील शेखर जगताप यांच्यासह त्यांच्या साथीदारांविरुध्द एका व्यावसायिकाने कुलाबा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करून गुन्हा नोंदविला असल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वकील शेखर जगताप याने गृह विभागाचे तत्कालीन उपसचिवांशी संगनमत करून विशेष सरकारी अभियोक्ता असल्याची खोटी व बनावट कागदपत्रे तयार करून ती बार कौन्सिल येथे सादर केल्याचे सदरच्या तक्रारीत नमूद केल्याची बाब माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने मा.न्यायालय आणि शासनाची फसवणूक करणाऱ्या संबंधितांविरुध्द कारवाई करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१२-०३-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) मरीन ड्राईव्ह पोलीस स्टेशन, मुंबई येथील गु.र.क्र.२९९/२०२१ व गुन्हे प्रकटीकरण विभाग-९, वांद्रे येथील गु.र.क्र.३५/२०२१, कोपरी पो.स्टे. जि.ठाणे गु.र.क्र.१७६/२०२१ व ठाणे नगर पोलीस ठाणे, जि.ठाणे गु.र.क्र.२०१/२०१६ या गुन्हयाप्रकरणी दिनांक ६/०८/२०२१ व मरीन ड्राईव्ह पोलीस स्टेशन, मुंबई येथील गु.र.क्र.३६५/२०२१ या गुन्हयाप्रकरणी दिनांक १८/११/२०२१ अन्वये तत्कालीन उप सचिव (विधी) श्री.किशोर भालेराव यांनी निर्गमित केलेले संबंधित आदेश/पत्र हे सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने निर्गमित केलेले नाहीत. त्यामुळे श्री.भालेराव यांनी सदर अनियमितता केल्याचे सकृतदर्शनी दिसून आले. यास्तव त्यांना विधी व न्याय विभागाच्या दिनांक २९/०१/२०२४ रोजीच्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले होते.

सदर अनियमिततेच्या अनुषंगाने श्री.भालेराव यांचे विरुध्द दिनांक २९/११/२०२४ रोजीच्या ज्ञापनान्वये ग्रामविकास विभागाकडून विभागीय चौकशीची कारवाई सुरु करण्यात आली आहे.

सदर प्रकरणातील तक्रारदार श्री.संजय एम.पुनामिया यांचे तक्रारीवरुन दिनांक ०३/०३/२०२४ रोजी कुलाबा पोलीस ठाण्यास गु.नों.क्र.४६/२०२४, कलम १७०, ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ४७४, १२० (ब) भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून सदरचा गुन्हा तपासाधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही

---

## कुलाबा (मुंबई) येथील रेडिओ क्लब येथे नवी जेट्टी उभारण्याची प्रक्रिया प्रलंबित असल्याबाबत

**(२०) २४१०९ (०८-०८-२०२४) श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील गेटवे ऑफ इंडिया जेट्टीवरील भार कमी करण्यासाठी कुलाब्यातील रेडिओ क्लब येथे नवी जेट्टी उभारण्याची निविदा प्रक्रिया काढण्यात आली असून सदर निविदा प्रक्रियेस प्रतिसाद नसल्याने जेट्टी उभारण्याचे काम प्रलंबित असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त नवी जेट्टी बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नितेश राणे (२८-०२-२०२५) :** (१) व (२) रेडिओ क्लब, मुंबई येथे पर्यटन/प्रवासी जेट्टी, टर्मिनल इमारत व तत्सम सुविधा पुरविणे या कामास शासन निर्णय दिनांक १६/०२/२०२४ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

सदर कामाचे कार्यारंभ आदेश दिनांक ११/१०/२०२४ रोजी निर्गमित करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.